विशेष लेख क्र.७४ | ३ ज्येष्ठ १९२९ शके (सायं ५.३०)

**२७ मे-पंडित नेहरु पुण्यतिथी** | गुरुवार, दि. २४ मे २००७

# आधुनिक भारताचे शिल्पकार

स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान दिवंगत पंडित जवाहरलाल नेहरु भारताच्या आधुनिक व पुरोगामी धोरणाविषयी मत व्यक्त करताना म्हणत "औद्योगिक व कृषी विकासासाठी धरणं आणि पोलाद कारखाने ही भारताची आधुनिक मंदिरे होत." औद्योगिक व कृषी क्षेत्रात संपन्नता लाभल्याशिवाय जागतिक स्पर्धेत भारत टिकणार नाही, असे त्यांच ठाम मत होतं. यासाठी कृषी उत्पन्न वाढीचे व वीज निर्मितीचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेऊन नेहरुंनी पंजाबमध्ये भाक्रानांगल, ओरिसात हिराकूड, आंधप्रदेशात नागार्जुनसागर असे मोठे प्रकल्प सरकारी महसुलातून उभारले. तर उद्योगपती टाटा यांच्या सहकार्याने जमशेदपूर येथे; सोव्हिएट रशियाच्या साहाय्याने मध्यप्रदेशात भिलाई येथे; ब्रिटनच्या मदतीने पश्चिम बंगालमधील दुर्गापूर येथे, तर जर्मनीच्या सहकार्याने ओरिसातील सरकेला येथे पोलाद कारखाने उभारले. कृषी विकासाच्या दृष्टीने त्यांनी बिहारमधील सिंद्री येथे खत कारखाना काढला. आंतरराष्ट्रीय नेता म्हणून ख्याती मिळालेल्या नेहरुंच्या रुबाबदार व्यक्तिमत्त्वाला विद्वत्तेची जोड लाभली. पुरोगामी व विज्ञाननिष्ठ दृष्टी, उदारमतवादी धोरण अशा बहुआयामी व्यक्तिमत्त्वामुळे केवळ भारतातच नव्हे, तर ते साऱ्या जगात लोकप्रिय झाले. २७ मे या नेहरुंच्या पुण्यतिथी दिनानिमित्त त्यांच्या कार्यकर्तृत्वावर प्रकाश टाकणारा हा लेख...

## नेहरु - संस्कृत पंडित

नेहरु घराणं हे मुळचं काश्मिरातलं. त्यांच्या पुर्वजांची 'संस्कृत पंडित' म्हणून जनमानसात ख्याती होती. म्हणूनच सारस्वत ब्राम्हण असलेल्या या घराण्याला 'पंडित' म्हणण्याचा प्रघात होता. अलाहाबाद येथील त्यांच आनंदभवन राजेरजवाड्यांनाही मोह पडेल इतकं भव्य व आकर्षक होत. मोतीलाल व स्वरुपराणी हे समृद्ध व सुखी दांपत्य. नेहरुंच शिक्षण विलायतेत झालं. असे असूनही हिंदुस्थानातून ब्रिटिश राजवटीचा शेवट कसा होईल, याचा त्यांना सदैव ध्यास असे. ऑक्सफर्ड युनिर्व्हसिटीत बॅरिस्टर पदवी संपादन केल्यावर त्यांनी काही काळ वकिली केली. त्यानंतर त्यांनी गांधीजींच्या ब्रिटीश सरकारविरुद्ध पुकारलेल्या असहकार चळवळीत उडी घेतली. जगात शांतता व सहजीवनाचे वातावरण कसं निर्माण होईल, यासाठी पंडितजींनी अथक परिश्रम घेतले.

## ऑगस्ट क्रांतीचा वणवा

मुंबईच्या गवालिया टँक येथील ऑगस्ट क्रांती मैदानावर ८ ऑगस्ट १९४२ रोजी अखिल भारतीय काँग्रेसचे अधिवेशन भरलं होतं. याप्रसंगी महात्मा गांधी, मौलाना आझाद सारख्या ज्येष्ठ-श्रेष्ठ नेत्यांनी ब्रिटिश राजवटीला आव्हान देण्याचा निर्णय घेऊन **चलेजाव** चा सज्जड इशारा दिला. यावेळी नेहरु आपल्या भाषणात म्हणाले की, "या लढ्यात आता माघार नाही. यात आम्ही विजय मिळवून आझाद हिंदुस्थानाच्या भूमीवर उभे राहू, अन्यथा खवळलेल्या महासागरात बुडून जगातून नाहिसे होऊ." **करेंगे या मरेंगे** अशी निर्वाणीची घोषणा करुन त्यांनी जनमानसाच्या अंत:करणात क्रांतीची ज्योत पेटवली

..२/-

## दहा वर्षाचा तुरुंगवास

भारतीयाच्या स्वातंत्र्य संग्रामाला कमजोर करण्याच्या कटाचा एक भाग म्हणून इंग्रजांनी गांधी-नेहरु सारख्या दिग्गजांची धरपकड केली. तथापि, तेथेही त्यांनी वाचन-लेखनात अधिकाधिक वेळ व्यतित केला. **डिस्कव्हरी ऑफ इंडिया** ही कादंबरी नेहरुंनी तुरुंगातच लिहिली. नेहरुंना अहमदनगरहून नैनीच्या तुरुंगात, नंतर डेहराडून कारागृह, बरेलीचे कारागृह, अलमोरा, लखनौ येथील कारागृहांमध्ये बंदी बनविण्यात आले. जवळपास १० वर्षाचा तुरुंगवास नेहरुंनी भोगला, तथापि न डगमगता धैर्याने आपला लढा त्यांनी कायम ठेवला. यावरुन त्यांच्या जाज्वल्य देशभक्तीचे प्रत्यंतर येते.

## इंदिराजींची उत्तम जडणघडण

प्रत्येक देशातील ज्येष्ठ नेते व तेथील परराष्ट्रीय धोरणाची, संस्कृतीची माहिती व्हावी, यासाठी नेहरु हे इंदिराजींना आपल्यासोबत परदेश दौऱ्यात नेत असत. त्यामुळे इंदिराजींची आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या नेत्यांशी ओळख झाली. त्याचप्रमाणे स्वातंत्र्य लढ्याची तसेच त्यातील वरिष्ठ नेत्यांचा परिचय व्हावा, याकरिता नेहरुंनी इंदिराजींना महात्मा गांधीच्या सहवासात ठेवलं. त्यातूनच इंदिराजींच्या मनात क्रांतीची बीजे रोवली गेली. आणि त्या स्वातंत्र्य लढ्यात सामील झाल्या व त्यासाठी तुरुंगवासही भोगला. पंडितजींनी इंदिराजींची बौद्धिक, सामाजिक, शैक्षणिक व राजकीय जडणघडण उत्तमरित्या केल्याने त्यापुढे पंतप्रधान पदापर्यंत पोहोचू शकल्या. इतकेच नव्हे तर, त्या पुढे आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या नेत्या म्हणून गणल्या गेल्या. खऱ्या अर्थाने याचं श्रेय पंडितजींना जातं.

## संयुक्त महाराष्ट्राची मुहूर्तमेढ

मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र राज्याची निर्मिती व्हावी, या मागणीच्या पुर्ततेसाठी १०६ हुतात्म्यांनी आपल्या प्राणाची आहुती दिली. संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती म्हणजे हुतात्म्यांच्या बलिदानाची फलश्रृतीच म्हणावी. या महान बलिदानाची महती जाणून तत्कालिन पंतप्रधान पंडित नेहरुंनी १ मे १९६० रोजी मुंबई येथील राजभवनात संयुक्त महाराष्ट्र राज्याची मुहूर्तमेढ रोवली. म्हणून या दिनाला सोनियाचा दिवस म्हणून संबोधले जाते. खरं म्हणजे नेहरुंचं महाराष्ट्रावर अपार प्रेम होतं.

## अलिप्तवादी राष्ट्रगटाची उभारणी

नेहरु हे भारताच्या परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार होते. १९४७ साली देशाला स्वातंत्र्य मिळाल्यावर नेहरु हे स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान झाले. पराराष्ट्र खातं त्यांनी आपल्याकडेच ठेवलं. अमेरिका व रशिया या दोन महाशक्तिंशी नेहरुंचे मित्रत्त्वाचे संबंध असल्याने एकाशी मैत्री, तर दुसऱ्याशी शत्रूत्त्व करण्यात त्यांना स्वारस्य नव्हतं. यासाठी त्यांनी अलिप्ततावादी धोरण अंगिकारले. देशा-देशांमधील कोणताही वाद-तंटा शांततेने, वाटाघाटीवरुन, सामोपचाराने सोडविण्याचे कौशल्य पंडितजींच्या अंगी होत. ब्रिटनचे तत्कालिन पंतप्रधान विल्यम चर्चिल यांनी **You are the light of asia** या शब्दात नेहरुंचा गौरव केला. पंडीतजींच्या आंतरराष्ट्रीय किर्तीची ही पावतीच ठरली. राष्ट्रपती डॉ.राजेंद्रप्रसाद यांनी नेहरुंना १९५५ साली **भारतरत्न** हा सर्वोच्च पुरस्कार बहाल करुन सन्मानित केलं. **आराम हराम है** हे ब्रीदवाक्य जनमानसाच्या मनावर बिंबवून नेहरुंनी नागरिकांना सतत क्रियाशील व कार्यतत्पर राहण्याचा जणू जीवनमंत्रच दिला.

..३/-

## मुलं देवा घरची फुलं

मुला-फुलांबाबतचा जिव्हाळा जवाहरलालजींच्या रोमारोमात भिनलेला होता. एकदा तर होळीच्या दिवशी त्यांच्या निवासस्थानी शाळकरी मुलं आली असल्याचे कळताच मंत्रिमंडळाच्या बैठकीतून उठून ते सरळ मुलांवर रंग उधळण्यासाठी मुलांच्या दिशेने धावले. मुठीमुठीने त्यांनी मुलांवर गुलाल उधळला. परंतु आपल्यावर गुलाल उधळण्यास मुले संकोच करीत असल्याचे पंडितजींना जाणवलं. मी तुम्हांला मोठा वाटतो का ? असे असेल तर मी खाली बसतो आणि सांगा बघू आता, कुठे आहे मी मोठा ? झालो की नाही आता लहान! अगदी तुमच्या एवढा! आता चला, उडवा माझ्यावर गुलाल! आपलं वय विसरुन, आपलं मोठेपण विसरुन ते लहान मुलांमध्ये लहान होत असत. जणू अगदी बाल नेहरुच! मुलांना ते 'देवा घरची फुलं' म्हणायचे. म्हणूनच मुलं पंडितजींना आदरानं **चाचा नेहरु** म्हणत.

## पंचशील तत्त्वे - शांतीदूत

जगात शांतता व सह-जीवनाचे वातावरण निर्माण व्हावे, यासाठी विश्वशांतीचा ध्वज खाद्यांवर घेऊन नेहरुंनी पंचशील तत्त्वाची आखणी केली. परस्परांचे राष्ट्रीय, प्रादेशिक ऐक्य व सार्वभौमत्त्वाचा भंग करु नये तसेच एकमेकांवर आक्रमण करु नये, एकमेकांच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप करु नये; परस्परांच्या समानतेला व हितसंबंधाला धक्का पोहोचू नये आणि शांततामय सह-जीवनावर भर द्यावा. विशेष म्हणजे चीन सारख्या बलाढ्य राष्ट्राला देखील नेहरुंनी पंचशील तत्त्वे स्वीकारण्यास भाग पाडलं. म्हणूनच जगभरात **शांतीदूत** म्हणून नेहरुंची ओळख होती. अशा या महान नेत्याचे २७ मे १९६४ रोजी देहावसान झाले. परस्पर सद्‌भाव, बंधुभाव, शांतता व सहजीवन या जीवनमुल्यांना आत्मसात करुन प्रत्येकाने आधुनिक भारताच्या उभारणीत योगदान द्यावे, म्हणजे हीच पंडितजींना खरी श्रद्धांजली ठरेल.

**- रणवीर रजपूत**
**वरिष्ठ सहाय्यक संचालक, मंत्रालय.**

०००